# पुस्तिका - १

## प्रस्तावना

## अॅक्वर्थ महापालिका कुष्ठरोग रुग्णालय थोडक्यात परिचय

अॅक्वर्थ महापालिका कुष्ठरोग रुग्णालय हे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कुष्ठरुग्णाना सर्वांगिण सेवा देणारे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे विषेश रुग्णालय आहे.

अॅक्वर्थ महापालिका कुष्ठरोग रुग्णालय ७ नोव्हेंबर १८९० रोजी तात्कालिन महापालिका आयुक्त यांनी स्थापन केले. सुरवातीची ५० खाटांची क्षमता गरजेमुळे १९५७ साली ५०० पर्यत वाढविण्यात आली. त्यावेळी आंतरुग्णांसाठी वैद्यकिय सेवांबरोबर अनेक पुनर्वसन उपक्रम सुरू करण्यात आले. परंतु त्यानंतर अनेक समाजाधारीत सेवा पुरविण्यासाठी रुग्णालयाने बाह्यरुग्ण विभाग सेवा व बृहन्मुंबई कुष्ठरोग नियंत्रण योजना सुरु केल्या. या योजनेखाली रोगनिदान व उपचार सुविधांसह १० परीक्षेत्रीय केंद्रे मुंबईत सुरु करण्यात आली. तदनंतर १९८४ चा कुष्ठरोग कायदा रद्द झाल्याने व कुष्ठरोगासाठी बहुविध औषधोपचाराच्या प्रगतीमुळे १९८४ नंतर संस्थाधारीत दीर्घकालीन आंतररुग्ण सेवेची गरज राहिली नाही. त्यामुळे रुग्णालयातील खाटांची संख्या हळूहळू कमी होत जाऊन आता ती २४० झाली आहे. अशाप्रकारे रिकामे झालेले पाच कक्ष आता एड्स नियंत्रण प्रकल्पाच्या कामासाठी वापरण्यात येत आहेत.

एप्रिल १९९१ पासून हे रुग्णालय पूर्णपणे बृहन्मुंबई महानगरपालिकेने घेतले असून कार्यकारी आरोग्य अधिका-यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली विशेष रुग्णालयांपैकी एक म्हणून कार्यरत आहे.

सही/-
कार्यकारी आरोग्य अधिकारी
सार्वजनिक आरोग्य खाते